# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयीचे कार्य: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**नाव :- संयोगिता दिलीप सोरटे.** संशोधक विद्यार्थिनी समाजशास्त्र आधीविभाग फोन न. :- 9657888420 Email:-- sanyogitasorate1993@gmail.com

---

**प्रस्तावना**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून जात होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जागतिक ख्याती आहे. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय ,धार्मिक असा जवळपास सर्व क्षेत्रात त्यांचे योगदान आहे. विशेषतः त्यांनी कामगारांच्या चळवळीसाठी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. देशाचा सामाजिक ,आर्थिक विकासामध्ये कामगार हा महत्त्वाची भूमिका बजावतो. भारतामध्ये कामगारांची स्थिती अत्यंत निराशाजनक होती. मालक भांडवलदार वर्ग दुर्बल घटक असंघटित कामगारांना तासन् तास राहून घेत होते कामगारांबद्दल बाबासाहेबांना खूप दयनियता वाटत होती कामगारांनी शून्य स्वाभिमान असल्या पेक्षा जीवन नाकारलेले बरे . त्यांनी त्यासाठी प्रतिकार केला पाहिजे, त्यामुळे कामगारांचे शोषण कमी होईल नाहीतर त्यांना गुलामी सारखे जीवन जगावे लागेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते बारा बलुतदार निर्माण करणाऱ्या उन्नत समाज व्यवस्थेने दलित ,अस्पृश्यांची ,कष्टकरी, शोषित कामगार वर्ग यांना गुलामासारखे राबवत आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १५ ऑगस्ट १९३८ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली .त्याचे अध्यक्ष बाबसाहेब होते. पक्षाचा जाहीरनामा 'टाइम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकातून पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला पक्षाची धोरण स्पष्ट करण्यासाठी दलित वर्ग कर्मचारी कामगार वर्ग यांची परिषद १२ ,१३ फेब्रुवारी १९३८ मध्ये मनमाड येथे झाली. त्यावेळी बाबासाहेब यांनी अध्यक्ष भाषणात असे म्हटले की ब्राह्मशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांची दोन शत्रू आहेत त्यानंतर त्यांनी स्वतंत्र मंजूर पक्ष स्थापन केला १७ मार्च 1938 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्व साधारण सर्वच सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हटले गरिबांचा पक्ष गरिबांनी चालवला पाहिजे. या शोधनिबंधमध्ये सामजिकदृष्ट्या कमगरणबाबत कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे

- **भारतीय राज्यघटनेतील श्रम :-**

भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांच्या हक्काचे संरक्षण केले आहे संविधानाप्रमाणे कामगार हा भारतीय राज्यघटनेचा अंतर्गत समवर्ती सूची मधील एक विषय आहे जिथे केंद्र आणि राज्य सरकासे दोन्ही केंद्र सरकारसाठी काही बाबींच्या आरक्षणासाठी कायदा करण्यास सक्षम आहेत .

- **शोधनाची उद्दिष्टे :-**

1) डॉ.बाबासाहेब यांचे कामगार विषय कार्याचा अभ्यास करणे.

२) डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी सामजिक दृष्ट्या कमगरणविषयी केलेल्या भूमिकांचा अभ्यास करणे

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगार नेतृत्वाचा अभ्यास करणे

- **संशोधनाचा स्त्रोत :--**

दुय्यम सामग्रीचा वापर, मासिके, पुस्तके, न्युज पेपर, इंटरनेट वेबसाईट इत्यादींचा वापर.

- **संशोधन पद्धती**:. प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम तथ्य सामग्रीवर आधारित आहे दुय्यम तथ्य संकलनाकरिता संदर्भ ग्रंथ पुस्तके, मासिकाच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

**सैद्धांतिक दृषटिकोन :---**

. प्रस्थुत शोधनिबंध लेखनसाठी कामगार विषयी डॉ.बाबासाहेबानी केलेल्या कार्याचा दृष्टिकोनाचा आधार घेतला आहे. भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉबी.आर. आंबेडकर यांनी कामगारांच्या हक्काचे संरक्षण केलें आहे देशाच्या आर्थिक- सामाजिक विकासामध्ये कामगार महत्वाची भुमिका बजावतात. त्यामुळे त्यांचे महत्व जाणून घेणे गरजेचे आहे

- **. आशय विश्लेषण:---**

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांना कामगाराच्या सक्षमीकरणासाठी बहुमूल्य योगदान दिले स्वतंत्र भारत सरकारमध्ये त्यांनी कायदा मंत्री आणि कामगार मंत्री म्हणूनही काम केले. या सर्व पदावर कार्यरत असताना त्यांनी कामगार कायद्याच्या क्षेत्रात आणि भारतीय कामगारांच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान खालील प्रमाणे आहे.

१)शेतकऱ्यांसाठी किमान वेतन दर असावेत अशी मागणी विधिमंडळात केली.

२) १९३७ साली कोकणातील बहुजन कामगारांचे शोषण थांबविण्यासंबंधी खोटी पध्दत नष्ट करण्यासंबंधी बिल मांडले

३) १९३८ साली कोकणातील 'औद्योगिक कलह विधेयकानुसार' कामगारांचा संप करण्याचा अधिकार हिरावुन घेतला गेला पण बाबासाहेबांनी या बिलावर भाषण करतांना संप हा दिवाणी अपराध आहे फौजदारी गुन्हा नव्हे असे मत दिले व पुढे कामगारांना संप करण्याचा कायदेशिर अधिकार मिळवून दिला.

४) वरील बिलावर भाष्य करतांना मालकांनी आपले अंदाजपत्रक कामगारांसाठी जाहीर करण्याची मागणी केली.

५) १९३८ मध्ये सावकारी नियंत्रण विधेयक तयार केले.

६) बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.

७) २ जुलै १९४२ ला ते व्हॉईसरॉय मंत्रीमंडळात कामगार मंत्री झाले. ह्या कारकिर्दीत त्यांनी कामगारांसाठी बरेच कायदे निर्माण केले.

८) २ सप्टेंबर १९४५ ला कामगार कल्याण योजना सादर केली. ही योजना लेबर चार्टर म्हणून प्रसिध्द आहे.

९) युध्द साहित्य निर्माण करणाऱ्या कारखान्यात एक 'सयुक्त कामगार नियामक समिती' स्थापन केली.

१०) सेवा योजन कार्यालय ( Employment Exchange ) ची स्थापना केली.

११) कामगारांना अगोदर भरपगारी रजा मिळत नव्हती. १४ एप्रील १९४४ ला बाबासाहेबांनी भरपगारी रजेचे विधेयक मंजूर केले

१२) कामगारांना कमीत कमी वेतन ठरविण्याची तरतूद असलेले बिल मांडले ह्यातूनच `किमान वेतन कायदा १९४८' ची निर्मिती झाली.

१३) औद्योगिक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणारी यंत्रणा(लवाद यंत्रणा) उभारण्याची तरतूद केली.

१४) सप्टेंबर १९४३ रोजी भरलेल्या त्रिपक्षीय कामगार परिषदेचे बाबासाहेब अध्यक्ष होते. त्यात त्यानी कामगारांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सांस्कृतिक गरजा व आरोग्याचे उपाय तसेच कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी उपाय यावरील ठराव संमत केले.

१५) ३१ जानेवारी १९४४ रोजी खाण कामगारांसाठी 'कोळसा खाण कामगार फंडाची' स्थापना करणारे विधेयक मांडले.

१६) ऑगष्ट १९४५ मध्ये औद्योगिक वसाहतीचे नियम व मालकाच्या जबाबदाऱ्या यावर विचारविनिमय करणाऱ्या स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविले. त्यात त्यांनी उद्योगासाठी मौलिक सूचना केल्या.

१७) ८ एप्रील १९४६ ला 'मिका माईन्स लेबर वेल्फेअर फंडाची' स्थापना करण्यासंबंधीचे बिल संमत केले

१८) 'इंडियन्स माईन्स (अमेंडमेंड) ऑर्डिनन्स १९४५' नुसार स्त्री कामगारांच्या मुलांसाठी पाळणा घराची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापनावर बंधन घातले.

१९) `भारतिय खाण कायदा १९४६' तयार करुन स्त्री कामगारांना खाणीत जमिनीच्या आंतमध्ये काम करण्यास व रात्रपाळीस बंदी केली.

२०) 'दि.माईन्स मॅटरनिटी बेनिफिट ऍक्ट' नुसार खाणीतील स्त्रीयांना बाळंतपणाची(प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर) रजा देण्याची शिफारस केली.

२१) 'दि.फॅक्टरी अमेंडमेंट बिल' संमत करुन कामगारांना १० दिवसाची पगारी रजा आणि बाल कामगारांना १४ दिवसाची पगारी रजा देण्यासंबंधी कायद्यात दुरुस्ती केली.

२२).१९४६ च्या बजेट सेशन मध्ये आठवड्याचे कामाचे तास ५४ वरुन ४८ व दिवसाला १० तासांऐवजी ८ तास करण्याचे बिल मांडले.

२३) अपघातग्रस्त कामगारांना मोबदला मिळावा म्हणून 'कामगार भरपाई कायद्याची' निर्मिती केली.

२४) २१ फेब्रुवारी १९४६ साली मध्यवर्ती कायदे मंडळात 'दि इंडियन्स ट्रेड युनियन्स(अमेंडमेंड) ऍक्ट आणून ट्रेड युनियनला मान्यता देणे व्यवस्थापनाला सक्तिचे करण्यासंबंधीचे विधेयक मांडले.

२५ ) १९ एप्रील १९४६ ला मध्यवर्ती कायदे मंडळात कमीत कमी मजुरी आणि कामगारांची संख्या किती असावी या संबंधी बिल मांडले व त्याचेच १९ फेब्रुवारी १९४८ ला कायद्यात रुपांतर झाले.

२६) बाबासाहेबांनी भारतीय घटनेची निर्मिती केली. त्यातील 'मार्गदर्शक तत्व' आर्टिकल ३९ (ड) नुसार पगारदार पुरुषा इतकाच पगार त्याच पदावर काम करणाऱ्या स्त्रियांनाही मिळावा अशी घटनात्मक तरतूद केली.

२७) घटनेच्या कलम ४३ नुसार गर्भवती व बाळंत स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी योग्य व सुरक्षित व्यवस्था ठेवण्याची तरतूद केली.

२८) कलम ४३ (अ) नुसार शासनाने कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी तरतूद केली.

२९) कलम ४३ नुसार शासनाने कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक संधी देण्यासाठी प्रयत्नकरण्याची तरतूद केली.

३०) 'स्टेट्स ऍण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथामध्ये वेठबिगार कामगारांच्या प्रश्नाला हात घालतांना बाबासाहेब 'वेठबिगार हा गुन्हा आहे' असे मत मांडले आहे.

३१) कामगारांचे आथिक जीवनमान उंचावण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात आर्थिक धोरण स्पष्ट केले त्यातील आर्टीकल २ सेक्शन २ (४) मध्ये आर्थिक शोषणाच्या विरोधात स्पष्टीकरण केले. त्यात कामगारांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संपत्तीची जास्तीत जास्त समान वाटणी करण्याबद्दल राज्याने प्रयत्न करावेत अशी सुचना केली.

३२) शेतीच्या प्रगतीसाठी व शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी लॅंड मॉर्गेज बॅं,शेतकऱ्यांची पतपेढी,खरेदी विक्री संघ इत्यादी स्थापण करण्याविषयी धोरण व्यक्त केले.

कामगार मित्रांनो बाबासाहेबांचे वरील बहुमूल्य योगदान पाहतां आज कामगारांची जी सुस्थिती दिसत आहे त्यात बाबासाहेबांचा निश्चितच सिंहाचा वाटा आहे. म्हणून बाबासाहेब हे सर्व कामगारांचे आदर्श असले पाहिजे

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामाविषयीचे कार्य :--**

**१) औद्योगीकरणानंतर शेतमजुरांमधील परिवर्तन:--** औद्योगिकरणानंतर अनेक शेतमजूर शेतीतून कारखान्याच्या कामाकडे वळू लागले आणि उपजीविकेच्या पर्यायांसाठी शहरांकडे स्थलांतरित झाले. भारतातील भांडवलदार वर्गासह वसाहती सरकारने त्यांच्या उत्पादन युन्ट्सिमधून नफा मिळविण्यासाठी स्वतःचे कारखाने सुरू केले कारखान्यांमधून अधिक नफा मिळविण्यासाठी मजुरांची पिळवणूक सुरू झाली बहुतेक कामगार अशिक्षित असल्यामुळे त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव नव्हती, मालकांना त्यांचे शोषण करणे सोपे होते.

कामगारांच्या हितासाठी कोणतेही सरकारी नियम किंवा कोणतेही संरक्षणात्मक उपाय नव्हते. जसजशी वेळ निघून जातो तसतसे भारतात कामगार कायद्यांची गरज वाढत जाते आणि १८८१ मध्ये ब्रिटिश सरकारने भारतातील कारखान्यांचे नियमन करण्यासाठी पहिला कारखाना कायदा पास केला.

**२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यानी स्थापन केलेला स्वतंत्र मंजूर पक्षाची स्थापना:--**

डॉ.बी.आर. आंबेडकरांनी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाच्या स्थापनेत इतर प्रमुख सदस्य होते. दादासाहेब गायकवाड, डी. व्ही. प्रधान, चित्रे, टिपणीस इ.

डॉ. आंबेडकरांनी या नवीन पक्षाच्या स्थापनेचे मुख्य कारण असे की, डॉ. आंबेडकरांच्या मते, काँग्रेस हा केवळ गरीब लोकांचा पक्ष नाही, तर त्यात धनाढ्य उद्योगपतींचा समावेश आहे.

कारखानदार, जमीनदार आणि भांडवलदार वर्ग. वस्तुस्थिती अशी आहे की, गरीब आणि श्रीमंत वर्गाचे स्वभाव सारखे नसतात. परंतु, कधीकधी ते एकमेकांच्या पूर्णपणे विरुद्ध असतात भारत सरकार कायदा १९३५ अंतर्गत निवडणुका झाल्यानंतर विधानसभेत बरेच कायदे संमत करावे लागतील. जर विधानसभेत काँग्रेसची मक्तेदारी असेल, तर कायद्यांचे स्वरूप श्रीमंतांसाठी फायदेशीर आणि कधी गरीब वर्गासाठी हानिकारक असू शकते. गरीब वर्गाच्या हिताच्या रक्षणासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना आवश्यक आहे. ॲडमिरल विष्णू भागवत यांच्या मते, डॉ. आंबेडकरांनी तीन मूलभूत तत्त्वांवर स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि ही तत्त्वे होती.

प्रथमः या जगातील सर्व संपत्ती, मालमत्ता आणि संपत्ती हे कामगार आणि शेतकऱ्यांच्या अखंड कष्टाचे परिणाम आहेत, असे असूनही शेतात हताश होऊन कष्ट करणारा कामगार व शेतकरी नग्न व उपाशी आहे. ही सर्व संपत्ती, संपत्ती आणि उत्पादनाची साधने हे नफेखोर, जमीनदार वर्ग, भांडवलदार आणि श्रीमंत वर्ग यांनी मनमानीपणे लादलेल्या खाजगी संपत्तीच्या अधिकारांनी बेकायदेशीर/अन्याय लूट, दरोडा आणि चोरी करून ही सर्व संपत्ती बळकावली आहे.

दुसराः भारतीय समाज शासित वर्ग आणि "शासक वर्ग" मध्ये विभागला गेला आहे, ज्यांचे हितसंबंध "शासक-शोषक" आणि "शासित शोषित" यांच्यातील वर्ग संघर्षाच्या रूपात परस्पर भिडतात आणि ही वस्तुस्थिती सर्वसमावेशक आहे.

तिसराः कामगार आणि कष्टकरी यांच्या हक्कांचे रक्षण केले जाऊ शकते आणि ते तेव्हाच सुरक्षित केले जाऊ शकतात जेव्हा राजकीय सत्तेची लगाम त्यांच्या स्वतः च्या हातात असेल.

**३) कामगारांच्या व जातीव्यवस्थेविषयी विचार -**

डॉ. आंबेडकरांचे कार्य भारतातील संविधान निर्मिती आणि दलितांच्या भल्यासाठी नेहमीच मर्यादित ठेवले जात आहे मात्र या दोन महत्त्वाच्या कामांसोबतच त्यांनी इतर क्षेत्रातही काम केले आहे. श्रम हे एक महत्त्वाचे क्षेत्र होते ज्यावर त्यांनी आयुष्यभर लक्ष केंद्रित केले होते.'भारतातील जाती' (Castes in India) या त्यांच्या एका लेखनात त्यांनी म्हटले आहे की, जात ही श्रमांची विभागणी नसून कामगारांची विभागणी आहे. केवळ या निबंधातून त्यांनी श्रमाचा प्रश्न कामगार कल्याणाच्या दृष्टिकोनातून नव्हे, तर जातिव्यवस्थेतून श्रमाची उत्पत्ती आणि उत्पत्ती या दृष्टिकोनातून मांडला आहे

**४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारांबाबतचे धोरण-**

राष्ट्र राज्याच्या विकासासाठी कामगार संस्कृती महत्त्वाची आहे. चीन, जपान, जर्मनीची कामगार संस्कृती भारतापेक्षा वेगळी आहे. धोरणात्मक आणि विकासाच्या दृष्टीच्या अभावामुळे राष्ट्र राज्याची सुरक्षा आणि एकात्मता निर्माण होईल जेव्हा आपण मागे वळून पाहतो तेव्हा भारत सरकारने स्वीकारलेल्या कामगार धोरणांचा थेट संबंध डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या धोरणांशी असतो

- **निष्कर्ष :--**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की, संप करण्याचा अधिकार कार्यकर्त्यांना आहे; पण संपाचे हत्यार जपून वापरावे आणि ते कार्यकर्त्यांच्या फायद्यासाठी असले पाहिजे, पक्षाच्या राजकीय हेतूसाठी नाही. आज आधुनिकीकरणाच्या जगात प्रत्येक कामगार संघटना राजकीय उद्दिष्टांसाठी संपाचे हत्यार वापरत आहे आणि विकास प्रक्रियेत अडथळा बनत आहे. त्यांनी असे सूचवले आहे की, अखिल भारतीय कामगार महासंघाने एकत्र येऊन असे धोरण तयार करावे जे सर्व कामगार वर्ग आणि सरकारी सेवेतील पुरुषांना समानतेने लागू करता येईल

- **सारांश -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले कामगारांबद्दलचे विचार आणि केलेले कार्य यांची प्रस्तुतता आजच्या काळातही प्रकाशाने जाणवते भारतामधील कामगारांना व कर्मचाऱ्यांना किमान वेतन, महागाई भत्ता, भर पगारी रजा,बोनस, आठ तास कामाचा दिवस, मध्यान्ह जेवणाची सुट्टी, अतिरिक्त कामासाठी दुप्पट दराने वेतन, आठवड्याची सुट्टी, असे अनेक दैनंदिन जीवनाशी निगडित अधिकार विशेष कष्ट न घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कामगार नेत्याने मिळवून दिलेले आहेत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

कामगारांना सदैव मार्गदर्शन करीत राहतील त्यामुळे एकविसाव्या शतकातही त्यांचे विचाराची व कार्याची कामगार सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

संदर्भसूची

१) आहेर अविनाश (2004), आंबेडकरांनंतर दलित चळवळींनी काय केलें?, कोमल प्रकाशन ,ठाणे.
२) कसबे रावसाहेब (2004), आंबेडकरवाद विसर्ग तत्व आणि व्यवहार,सुगावा प्रकाशन, पुणे.
३) किरण धनंजय (१९६६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर,पॉप्युलर प्रकाशन मुंबई
४) वैद्य प्रभाकर (१९८१), डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म, शलाका प्रकाशन.